MHKO070021292019

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ९४६/२०१९ मधील निशाणी क्र. ०१ वरील आदेश**
**( नांदणी सहकारी बँक लि., नांदणी ---विरुद्ध--- श्री. अर्जुन कांबळे )**

प्रस्तुतचा खटला परक्राम्य लेखा अधिनियमाचे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात आरोपी हजर झालेला नाही. प्रकरण तडजोडपात्र असल्यामुळे फिर्यादीच्या विनंतीनुसार राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ठेवण्यात आले.

०२) फिर्यादी बँकेचे वसुली अधिकारी श्री. रुस्तम गुलाब मुजावर हजर आहेत. फिर्यादी बँकेने निशाणी क्र. ०७ वर तसदीकपत्र सादर करुन फिर्यादी बँकेस सदर प्रकरण पुढे चालवण्याचे नसलेने प्रस्तुत प्रकरण निकाली करण्यात यावे अशी विनंती केली. सदर तसदीक पत्र वाचले आणि अभिलिखीत करण्यात आले.

०३) फिर्यादी यांनी दाखल केलेल्या निशाणी क्रमांक ०७ वरील तसदीक पत्राच्या आधारे खटला संपुष्टात येतो. त्यामुळे खटल्यामधील अंतिम आदेश खालीलप्रमाणे पारीत करण्यात येतात.

## आ दे श

१} आरोपी **अर्जुन रामचंद्र कांबळे** याची परक्राम्य लेखा अधिनियमाचे कलम १३८ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयामधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५७ नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२} अर्जातील सर्व अंतरिम आदेश रद्दबातल करण्यात येतात.

३} प्रकरणातील कोर्ट स्टॅम्प फी रक्कम नियमाप्रमाणे परत करण्यात यावी.

४} प्रकरण दाखल दप्तर करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Anand Devidasrao Karbhajan
Date: 2022.05.07 15:44:56 +0530

( **आनंद दे. करभाजन** )
**पॅनल प्रमुख तथा**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

राष्ट्रीय लोक अदालत.
ठिकाण :– जयसिंगपूर.
दिनांक :– ०७/०५/२०२२